**<u>नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०१४</u>**
**<u>शालीका वि. भरत व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले आणि वादीचे अधिवक्ता श्री. एस.पी. कांबळे व प्रतिवादी क्र.९ चे अधिवक्ता श्री. बी.पी. नवटक्के यांना ऐकले. त्याप्रमाणे अधिवक्ता श्री. बी.पी. नवटक्के हे प्रतिवादी क्र.९ करिता हजर आहेत. त्याप्रमाणे त्याची नोंद घेतली.

०२. वादीचे युक्तिवादाप्रमाणे प्रतिवादी क्र.८ व्यंकटराव नारायण बिरादार यांना दावा समन्सची बजावणी झालेली आहे. अर्ज निशाणी ६१ प्रमाणे वादीने यादी निशाणी ६२ सोबत नोंदणीकृत डाकेने पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची पोचपावती दाखल केली. सदर पावती ही निशाणी ७४ वर आहे. वादी शालीकाने शपथपत्र निशाणी ७५ दाखल केले आणि अनुसया ही प्रतिवादी क्र.८ ची पत्नी असल्याचे व तिच्यावर दावा समन्सची बजावणी झाल्याचे नमूद केले. परंतु प्रतिवादी क्र.८ ला दाव्यामध्ये दि.२०/०२/२०२१ रोजी सांगितलेले आहे. तत्पूर्वी त्यांना दाव्यामध्ये पक्षकार का करू नये या संबंधाने नोटीस काढली होती. सदर पोचपावती ही कारणे दाखवा नोटीसची आहे, ती दावा समन्स ची नाही. त्यामुळे वादीचा युक्तिवाद नामंजूर केला. प्रतिवादी क्र.८ ला दावा समन्सची बजावणी झालेली नाही. सबब वादीने त्याबाबत योग्य ती कार्यवाही वजा पूर्तता करावी. अन्यथा उचित आदेश पारीत केला जाईल. संबंधितांनी नोंद घ्यावी.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.08.21 17:43:53 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – २१–०८–२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**